| | |
|---|---|
| MHST07-0046142019 | दाखल तारीख :- ०४/१२/२०१९.<br>नोंदणीतारीख :- ०६/१२/२०१९.<br>निकाल तारीख:- ०६/०८/२०२६.<br>कालावधी :- वर्षे महिने दिवस<br>०७ ०३ २५ |

**२ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कराड, ता. कराड, जि. सातारा यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी श्रीमती ए.व्ही. मोहिते)**

**(न्यायनिर्णय दि.०६/०८/२०२६)**

**नियमित फौजदारी खटला नं. ४७७/२०१९.** **निशाणी क्र. ४७.**

गुन्हा रजिस्टर क्र. ४५४/२०१९

पोलिस स्टेशन - कराड तालुका, ता.कराड, जि.सातारा

| | |
|---|---|
| **अभियोगपक्ष** | **महाराष्ट्र सरकारतर्फे पोलिस अधिकारी,**<br>कराड तालुका पोलीस ठाणे,<br>मुळ तक्रारकर्ता - रोहन ज्ञानदेव पाटील, |
| सरकार/अभियोगपक्षातर्फे विधिज्ञ | श्री. के.ए. कोळी, सहा. सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | **सचिन उत्तम मंडले,**<br>वय- २६, व्यवसाय- मजुरी,<br>रा. सोनावडे, ता.पाटण, जि.सातारा.<br>हल्ली रा. धोंडेवाडी, ता.कराड, जि.सातारा. |
| आरोपीतर्फे वकील | श्री. बी.व्ही. मोहिते. |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | दि.२०/१०/२०१९. |
| गुन्हा नोंद तारीख | दि.३०/१०/२०१९. |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | दि.०४/१२/२०१९. |

| | |
|---|---|
| दोषारोप ठेवल्याची तारीख | दि.१६/०६/२०२५. |
| अभियोग पक्षाचा पुरावा चालू झाल्याची तारीख | दि.२३/०१/२०२६. |
| न्यायनिर्णयासाठी निश्चीत केलेली तारीख | दि.०६/०८/२०२६. |
| न्यायनिर्णयाची तारीख | दि.०६/०८/२०२६. |
| शिक्षेचा आदेश, दिला असल्यास, ती तारीख | निरंक. |

**आरोपीची माहिती**

| अ.क्र | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामिन दिल्याची तारीख | कलम | आरोपीस निर्दोष सोडले/ शिक्षा दिली | शिक्षा दिली असल्यास | प्रकरण चालू असताना आरोपी जेलमध्ये असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सचिन उत्तम मंडले | ३०/१०/२०१९ | ०१/११/२०१९ | भा.दं.वि. कलम ३८१ अन्वये | आरोपी निर्दोष मुक्त. | निरंक | निरंक |

**अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदारांची यादी –**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| साक्षीदार क्र.१ | प्रशांत गणपत कदम (नि.क्र. ३१) | घटनास्थळ पंच |
| साक्षीदार क्र.२ | शिवाजी शामराव काकडे (नि.क्र. ३३) | घटनास्थळ पंच |
| साक्षीदार क्र.३ | अंकुश धोडीराम भोसले (नि.३६) | साक्षीदार |
| साक्षीदार क्र.४ | रोहन ज्ञानदेव पाटील (नि.३७) | खबरी |
| साक्षीदार क्र.५ | बाळकृष्ण हिंदूराव जगदाळे (नि.४१) | तपासी अधिकारी |

**आरोपीने तपासलेल्या साक्षीदारांची यादी –**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**न्यायालयाने तपासलेल्या साक्षीदारांची यादी –**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**अभियोगपक्षाची निशाण्यांची कागदपत्रे –**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | खबर | नि. ३८. |
| २. | लेखी आदेश | नि. ४२. |
| ३. | घटनास्थळ पंचनामा | नि.४३ |
| ४. | अंकुश धोंडीराम भोसले यांच्या जबाबातील 'अधोरेखांकीत भाग अ' | नि. ४४ |

**आरोपीतर्फे अभियोगपक्षाने स्वीकृत केलेली कागदपत्रे –**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**आरोपीने दाखल केलेले कागदपत्रे व त्याच्या निशाण्या –**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**न्यायालयाने दिलेल्या निशाण्यांची कागदपत्रे –**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**मुद्देमाल असल्यास त्याचा तपशिल –**

| अ.क्र. | मुद्देमाल / वस्तु क्र. | तपशिल |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

## (घोषित दिनांक ०६/०८/२०२६)

सदर खटला विरूध्द भारतीय दंड संहिता कलम ३८१ अन्वये ठेवण्यात आलेल्या दोषारोपाकरीता चालविण्यात आला.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन–**

२. माहे सप्टेंबर २०१९ मध्ये गणेशोत्सव व नवरात्रोत्सव असे सण असल्यामुळे व विधानसभा निवडणुक असल्याने खबरी शेतात जात येत नव्हते. त्यामुळे त्यांचे शेतातील शेडवर असलेले साहित्याकडे खबरीचे दुर्लक्ष झाले होते. दि.२०/१०/२०१९ रोजी आरोपीने खबरीला 'मला तुमचे शेतात मजुरीचे काम करायचे नाही' असे सांगितले. त्यावेळी खबरीने आरोपीला व्यवहाराबाबत बोलला व आरोपीने खबरीचे पैसे दिल्यानंतर व्यवहार पूर्ण झालेनंतर दुसरीकडे चांगले काम कर असे सांगून पाठविले. विधानसभेचा निकाल दि.२४/१०/२०१९ रोजी लागलेनंतर दि. २५/१०/२०१९ रोजी खबरी व त्यांची पत्नी सौ. वैशाली शेतावर गेले असता त्यांनी त्यांच्या तिन्ही शेडची पाहणी केली. त्यावेळी त्यांना शेडमध्ये ठेवलेले एक पाण्याची मोटार, स्प्रींकल पाईप, बेस, प्लास्टिक बेंड व लोखंडी मोगणा असे साहित्य दिसले नाही. त्यामुळे त्यांनी सदर साहित्याची शोधाशोध घेतली. परंतु, सदर साहित्य त्यांना मिळून आले नाही. त्यामुळे त्यांची खात्री झाली की, वरील साहीत्य हे आरोपीने याने चोरले आहे. त्यामुळे घटनेबाबत रोहन ज्ञानदेव पाटील यांनी खबर दिली.

३. वरील खबरवरुन कराड तालुका पोलिस स्टेशन येथे गुन्हा रजि. क्र. ४५४/२०१९ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला. सदर दाखल गुन्हयाचा तपास पोलिस हवालदार श्री. बी.एच. जगदाळे, ब.क्र. १८५० यांचेकडे सोपविण्यात आला. त्यानुसार त्यांनी तपास केला. संबंधीत साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले. घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. तद्नंतर त्यांनी आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** मी आरोपीविरूध्द निशाणी २७ अन्वये दोषारोप ठेवले. आरोपीने गुन्हा कबूल नसून खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

**५.** आरोपीचे निशाणी क्र. ४५ अन्वये फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविले. त्यामध्ये आरोपीने राजकीय संबंध वापरून त्याचे विरूध्द खोटी केस दाखल केल्याचे कथन केले.

**६.** संचिकेचे अवलोकन केले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला. खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण झाले व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविले.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, आरोपीने दि. २०/१०/२०१९ रोजी धोंडेवाडी, ता.कराड, जि.सातारा गावचे हद्दीत, खबरीचे विंग खिंड व गावंदर नावचे शिवारातील शेतातील शेडमधून माहे सप्टेंबर मध्ये आरोपी हा खबरी रोहन ज्ञानदेव पाटील यांचे मालकीचे शिवारात कामावर असताना शेतातील शेडमधून एक ५ एच पी इलेक्ट्रीक मोटार लाडा लक्ष्मी कंपनीची, ३० स्पीकलर पाईप प्लॅस्टीकच्या ३ बेस/नोझल स्प्रींकलचा लोखंडी, १ प्लॅस्टीक बेन्ड काळे रंगाचा, टिबक पाईप गुंडाळण्याची मशीन असे शेतीचे एकूण रू.२२,१००/- च्या साहित्याची खबरीला कल्पना न देता व त्यांच्या संमतीविरूध्द चोरी केली व म्हणून आरोपीने भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३८१ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपी निर्दोष मुक्त. |

## का र ण मि मां सा

**<u>मुद्दा क्र. १ करीता</u>** –

७. आरोपीविरूध्द आरोप शाबित करण्यासाठी अभियोगपक्षाने भारतीय दंड विधान कलम ३८१ अन्वये आरोपीने खबरी रोहन ज्ञानदेव पाटील यांच्या शेतातील शिवारातील शेडमधून एक ५ एच पी इलेक्ट्रीक मोटार लाडा लक्ष्मी कंपनीची, ३० स्पीकलर पाईप प्लॅस्टीकच्या ३ बेस/नोझल स्प्रींकलचा लोखंडी, १ प्लॅस्टीक बेन्ड काळे रंगाचा, टिबक पाईप गुंडाळण्याची मशीन असे शेतीचे एकूण रू.२२,१००/–किंमतीचे साहित्य खबरीला कल्पना न देता व त्यांच्या संमतीविरूध्द चोरून नेले ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे.

८. अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री. के.ए. कोळी यांनी युक्तीवाद केला की, सदर प्रकरणामध्ये आरोपीविरूध्द ठोस व सुसंगत पुरावा आलेला आहे. फिर्यादी यांच्या साक्षीला स्वतंत्र साक्षीदारांची पुष्टी मिळाली आहे. त्यामुळे अभियोगपक्षाचा पुरावा हा आरोपीने गुन्हा केला असे निःसंशय सिध्द करतो. त्यामुळे आरोपीला दोषी ठरवण्यात येवून शिक्षा देण्यात यावी.

९. आरोपीचे वकील श्री. बी.व्ही. मोहिते यांनी युक्तीवाद केला की, सदर प्रकरणामध्ये सर्व साक्षीदारांचा जबाब एकमेकांशी सुसंगत नाही. केवळ फिर्यादीच्या साक्षीवर विसंबून गुन्हा सिध्द झाला असे म्हणता येणार नाही. त्यामुळे अभियोगपक्ष सदरचा गुन्हा सिध्द करण्यास अयशस्वी ठरलेला आहे. त्यामुळे आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात यावी.

१०. पंच प्रशांत (सा.क्र.१) यांनी त्यांच्या पुराव्यात त्यांना घटनास्थळ पंचनाम्याकरीता बोलविले नव्हते. ते शेतात काम करीत असताना पोलिसांनी फक्त त्यांची एका कागदावर सही घेतल्याचे कथन केले आहे. तसेच, पंच शिवाजी (सा.क्र.२) यांनी देखील त्यांच्या पुराव्यात, पोलिसांनी त्यांना खबरीच्या वस्तीवर बोलविले होते. परंतु, त्या ठिकाणी त्यांच्यासमक्ष काय झाले हे माहित नसल्याचे कथन केले आहे. तसेच, अंकुश

(सा.क्र.३) यांनी त्यांच्या पुराव्यात सन २०१९ मध्ये ते खबरीच्या शेडमध्ये कामाला होते. दि. २४/१०/२०१९ रोजी काय घटना घडली हे माहित नसल्याचे व त्यादिवशी चोरीची काय घटना घडली याची कल्पना नसल्याचे व पोलिसांनी त्याचा चौकशी करून जबाब घेतला नसल्याचे कथन केले आहे.

**११.** सदर पंच प्रशांत (सा.क्र.१) व पंच शिवाजी (सा.क्र.२) यांनी त्यांचे उलटतपसात, पंचनामा त्यांच्यासमक्ष तयार करून त्यांनी त्यावर वाचून सही केली ही बाब स्पष्टपणे नाकारलेली आहे. तसेच, अंकुश (सा.क्र.३) यांनी त्याचे उलटतपासात, आरोपीने खबरीचे शेडमधून शेतीचे साहित्य चोरल्याचे व पोलिसांनी त्यांच्याकडे चौकशी करून जबाब घेतल्याची बाब स्पष्टपणे नाकारली आहे. सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षाच्या कथनास दुजोरा न दिल्यामुळे सदर साक्षीदारांना उत्तरसूचक प्रश्न विचारण्यात आले. परंतु, अभियोगपक्षास सहकार्य होईल असा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

**१२.** खबरी रोहन (सा.क्र.४) यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये, त्यांचा शेती व्यवसाय धोंडेवाडी येथे आहे. सदरचा शेती व्यवसाय ते मजूरांकडून करून घेतात. आरोपी त्यांच्याकडे सन २०१८ सालापासून कामाला होता. सप्टेंबर २०१९ मध्ये गणपती सन, नवरात्र व इलेक्शन कामामुळे खबरी शेतात ८ दिवस आले नव्हते. दि.२०/०९/२०१९ रोजी आरोपीने खबरीला काम सोडणार असल्याचे सांगितले. त्यावेळी खबरीने आरोपीला त्याचे कामाचे पैसे दिले व त्यानंतर आरोपीने काम सोडले. दि.१५/०९/२०१९ रोजी खबरीने आरोपीला ५ एच.पी इलेक्ट्रीक मोटर गावंदर नावाच्या शिवारातून विंगखिंड येथील शिवारातील शेडमध्ये नेवून ठेवण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे आरोपीने गाडीवरून सदरची मोटर खबरीच्यासमोरून घेवून गेला. दि.२४/०९/२०१९ व दि. २५/०९/२०१९ रोजी खबरी व त्यांची पत्नी वैशाली विंगखिंड शिवारातील शेडमध्ये गेले. त्याठिकाणी त्यांना मोटर आढळून आली नाही. त्यावेळी खबरीने आरोपीला फोन करून विचारले असता आरोपीने त्यांना उडवा उडवीची उत्तरे दिली व त्यांचा मोबाईल क्रमांक ब्लॉक केला. त्यानंतर त्यांनी

वस्तूंची पाहणी केली असता, स्प्रींकलरच्या ३० पाईप प्रत्येकी २० फूट, ३ नोझल स्प्रींकलर, एक बेंड, एक मोगना, एक ठिबक पाईप गुंडाळण्याची मशीन या वस्तू त्यांना शेडमध्ये आढळून आल्या नाहीत. त्यामुळे त्यांनी दि. ३०/१०/२०१९ रोजी खबर दिली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळ खबरीने दाखविले असे कथन केले आहे.

**१३.** खबरी रोहन (सा.क्र.४) यांनी त्यांच्या उलटतपासात, चोरीला गेलेला मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातून मिळालेला नाही ही बाब स्पष्टपणे मान्य केली आहे. त्यामुळे आरोपीने सदर साहित्यांची चोरी केली याबाबत शंका निर्माण होते.

**१४.** तपासी अधिकारी श्री. जगदाळे (सा.क्र.५) यांनी तपासादरम्यान केलेल्या बाबींचा ऊहापोह केला.

**१५.** सदर खटल्यामध्ये खबर जरी शाबीत झाली असली तरी केवळ खबरीचे व तपासीक अधिकारी यांचे साक्षीवर विसंबून राहता येणार नाही. तसेच, खबरी रोहन (सा.क्र.४) यांनी उलटतपासात चोरीला गेलेला मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातून मिळालेला नसल्याचे स्पष्टपणे मान्य केले आहे. खबर देण्यास झालेल्या विलंबाबात कोणतेही समाधानकारक खुलासा अभियोगपक्षाने केलेला नाही. खबरी याच्या पुराव्यामध्ये वाढीव मजकूर सांगितला आहे. सदरचा मजकूर हा खबरमध्ये नमूद नाही. खबरीविरूध्द आरोपीच्या पत्नीने एन.सी. रिपोर्ट दिला होता ही बाब देखील अभिलेखावर आली आहे. त्यामुळे एकंदरीतच खबरीच्या साक्षीबद्दल संशय निर्माण होतो. तसेच, आरोपीला चोरी करताना पाहणारे कोणतेही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत. तसेच, आरोपीच्या ताब्यातून कोणताही मुद्देमाल जप्त केलेला नाही.

**१६.** पंच प्रशांत (सा.क्र.१) व पंच शिवाजी (सा.क्र.२) यांनी पोलिसांनी त्यांना खबरीच्या वस्तीवर बोलविले होते. परंतु, त्या ठिकाणी त्यांच्यासमक्ष काय झाले हे माहित

नसल्याचे कथन केले आहे. सदर दोन्ही पंच साक्षीदारांनी अभियोगपक्षास समर्थन केलेले नाही. त्यामुळे पंचनामा सिध्द होवू शकलेला नाही. करीता, आरोपीविरूध्द कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे, आरोपीवर ठेवण्यात आलेले आरोप कोणत्याही विवेकी संशयापलीकडे सिध्द करण्यास अभियोगपक्ष अपयशी ठरलेला आहे. सबब, मी विचाराधीन असलेल्या मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष मी 'नकारार्थी' नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. २ करीता**–

**१७.** ज्याअर्थी, मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात आले आहे. त्याअर्थी, आरोपीची निर्दोष मुक्तता करणे क्रमप्राप्त ठरते. करीता, मुद्दा क्र. २ बाबत खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. आरोपी **सचिन उत्तम मंडले** याची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३८१ च्या दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीने प्रकरणात मुळतः दाखल केलेला वैयक्तीक मुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ (१) च्या पुर्ततेकरीता आरोपीने रक्कम रुपये १५,०००/– (अक्षरी रक्कम रू. पंधरा हजार केवळ) वैयक्तीक मुचलका व तेवढयाच रक्कमेचा जामीन कदबा न्यायालयात दाखल करावा.

*(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)*

Digitally signed by ASHA VISHAL MOHITE
Date: 2026.08.06 16:49:55 +0530

ठिकाण– कराड (श्रीमती ए.व्ही. मोहिते)

दि.०६/०८/२०२६. २ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कराड

ता. कराड, जि.सातारा.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P. D.F. file judgment are same word for word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Shri. V. S. Musale |
| Court Name | :- | Smt. A. V. Mohite,<br>2nd Judicial Magistrate First Class, Karad. |
| Judgment Dictated on | :- | 06/08/2026. |
| Judgment signed by presiding officer on | :- | 06/08/2026. |
| Judgment uploaded on | :- | 06/08/2026. |